वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक : ०७ मे, २०२१

२. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

३. मा.आयुक्त सो यांचा दिनांक : ०८ /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/६७४/२०२४
दिनांक : ०८ /१०/२०२४

**विषय :- 'प्रशासन अधिकारी' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर '**प्रशासन अधिकारी**' या अभिनामाची पदे **पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन राजपत्र, दि. १८ फेब्रुवारी २०२० मधील नियमातील परिशिष्ट-(३) नियम १०.२ नुसार विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देवून पदोन्नतीपूर्व '**कार्यालयीन अधिक्षक**' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दि.०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार '**प्रशासन अधिकारी**' पदावर **पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **कार्यालय अधिक्षक नाव** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** | **नव्याने सोपविण्यात येणारा विभाग/ अतिरिक्त कार्यभार** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | बोर्डे श्रध्दा सतीश | ज्येष्ठतेनुसार | नागरी सुविधा केंद्र |
| २ | भांगले संजीव शांताराम | ज्येष्ठतेनुसार | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय |
| ३ | लिमण गोरखनाथ शंकर | ज्येष्ठतेनुसार | सामान्य प्रशासन |
| ४ | ढवळे ज्ञानेश्वर दिगंबर | ज्येष्ठतेनुसार | फ क्षेत्रीय कार्यालय |
| ५ | भाट ग्यानचंद हरी | ज्येष्ठतेनुसार | आकाशचिन्ह व परवाना |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार '**प्रशासन अधिकारी**' या पदावर **पे.लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४००** या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यास मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
***(शेखर सिंह)***
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत-
१) लेखा विभाग
२) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग
४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

सहा. आयुक्त (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,